





दैनिक

# आरंभपर्व

आरंभ एका नव्या पर्वाचा

Epaper : www.aparv.com

**1,22,570** डिजिटल प्रतींचे दररोज सोशल मीडियाच्या माध्यमातून वितरण होणारे

**पुण्यातील लोकप्रिय दैनिक**



● वर्ष : ०२ ● अंक : ०८९ ● पुणे ● गुरुवार, दि. १३ फेब्रुवारी २०२५ ● मराठी दैनिक ● पाने ४ ● किंमत : २ रूपये ● RNI No.-MAHMAR/2023/89313




ॲड. प्रसन्नदादा जगताप यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

3



पुण्याच्या लक्झरी रिअल इस्टेटमध्ये मार्व्हल...

4



# ठाकरे गटाला मोठा धक्का

## राजन साळवी यांचा जय महाराष्ट्र; शिंदे गटात आज प्रवेश

- पक्षाच्या उपनेतेपदाचा दिला राजीनामा
- धनुष्यबाण घेणार हाती

**मुंबईः (दै. आरंभ पर्व)**

शिवसेनेचे (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याशी निष्ठा राखणारे आणि रत्नागिरी जिल्ह्यातील राजापूरचे माजी आमदार आणि उपनेते राजन साळवी यांनी अखेर ठाकरे गटाला जय महाराष्ट्र केला. साळवी यांनी बुधवारी पक्षाच्या उपनेतेपदाचा राजीनामा देत ठाकरे गटातून बाहेर पडण्याचा निर्णय घेतला. शिवसेनेचे मुख्यनेते, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत साळवी आज गुरुवारी शिवसेनेत प्रवेश करणार आहेत. साळवी यांच्या पक्ष सोडण्याच्या निर्णयामुळे लांजा-राजापूर विधानसभा मतदार संघात ठाकरेंना मोठा धक्का बसणार आहे.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी २०२२ मध्ये शिवसेनेत अभूतपूर्व बंड केल्यानंतर जे काही मोजके आमदार उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहिले त्यापैकी राजन साळवी एक होते. उद्धव ठाकरेंसोबत राहिल्यामुळे साळवी यांच्याविरोधात लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या चौकशीचे शुक्लकाष्ठ मागे लागले होते. तरीही साळवी यांनी ठाकरे यांची साथ सोडली नव्हती. राजन साळवी यांच्या पक्ष प्रवेशामुळे एकनाथ शिंदे गटाला कोकणात आणखी बळ मिळणार आहे. सध्या रत्नागिरी जिल्ह्यात शिंदे गटाचे उदय सामंत, किरण सामंत, योगेश कदम असे तीन आमदार आहेत. पक्षात फूट पडण्यापूर्वी रत्नागिरी जिल्ह्यात शिवसेनेचे चार आमदार होते. फुटीनंतर राजन साळवी, वैभव नाईक आणि भास्कर जाधव हे उद्धव ठाकरे यांच्यासोबत राहिले होते. आता साळवींनी ठाकरे गटाला सोडचिठ्ठी देण्याचा निर्णय घेतल्याने ठाकरेंकडे रत्नागिरी जिल्ह्यात भास्कर जाधव यांच्या रूपाने एकमेव नेतृत्व राहिले आहे.

# महाविकास आघाडीला हादरे!

## शरद पवार-ठाकरे गटात जुंपली

## शिंदेंचा सत्कार अन् ठाकरे गटाचे फुत्कार

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

विधानसभा निवडणुकीतील दारुण पराभवानंतर राज्यातील महाविकास आघाडी फुटीच्या उंबरठ्यावर असतानाच राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे अध्यक्ष शरद पवारांच्या हस्ते झालेला सत्कार आणि शिंदे यांच्यावर पवारांनी उधळलेली स्तुतीसुमने यामुळे महाविकास आघाडीत नवी आग लागली आहे.

दिल्लीत मंगळवारी झालेल्या सोहळ्यात उपमुख्यमंत्री शिंदे यांना सरहद संस्थेचा महादजी शिंदे राष्ट्रीय गौरव पुरस्कार देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. हा पुरस्कार जाहीर झाल्यानंतर तशी कोणतीही प्रतिक्रिया ठाकरे गटाने दिलेली नव्हती. मात्र, हा पुरस्कार दिल्यानंतर शरद पवारांनी केलेल्या भाषणाने ठाकरे गटात संतापाचा आगडोंब उसळला.



ठाकरे गटाचे नेते संजय राऊत रोज सकाळी त्यांच्या विरोधकांवर तिरंदाजी करत असतात. ज्या पवारांचे कट्टर समर्थक म्हणून राऊत ओळखले जातात त्याच पवारांकडे बुधवारी राऊतांचे शरसंधान सुरू झाले आणि महाविकास आघाडीला फुटीचे नवे हादरे बसले.

राऊत म्हणाले, हा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंचा सत्कार नाही तर शरद पवारांनी जणू अमित शहा यांचा सत्कार केला आहे, असे आम्ही मानतो. हा महाराष्ट्र तोडणाऱ्या शहांचा सत्कार आहे. आम्हाला तुमचे दिल्लीतील राजकारण काय आहे हे माहीत नाही. मात्र, आम्हालाही दिल्लीतील राजकारण समजते. ज्यांनी महाराष्ट्र कमजोर केला अशा लोकांना आपण सन्मानित केले. यामुळे मराठी माणसांच्या हृदयाला नक्कीच वेदना झाल्या असतील. महाराष्ट्रातल्या जनतेला हे पटलेले नाही, असे राऊत म्हणाले.

### राऊतांचे संतुलन बिघडले : शिंदे गट

**राऊत यांच्या पवारांवरील टीकेचा एकनाथ शिंदे यांनी कठोर शब्दांत समाचार घेतला. टीका करणाऱ्यांना जनतेने त्यांची जागा दाखवली आहे. लोकांनी त्यांना चारीमुंड्या चित केले आहे. त्यामुळे त्यांचे संतुलन बिघडले आहे. त्यांना द्वेषाने एवढे पछाडले आहे.**

### पवार काय म्हणाले?

**शिंदेंनी सर्वांना सोबत घेत राज्याचा विकास केला. राजकीय दुरावा कमी केला. मुंबई, ठाणे व नवी मुंबईच्या विकासाला गती दिली, अशा शब्दांत शरद पवारांनी शिंदे यांचे तोंडभरून कौतुक केले आणि आधीच दभंगलेल्या महाविकास आघाडीत हेच कौतुक भांडणाचे नवे कारण बनले.**

# रूपाली चाकणकर यांच्याबद्दल आक्षेपार्ह पोस्ट केल्याप्रकरणी दोघांना अटक

**उरुळी कांचन : (दै. आरंभ पर्व)**

राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्याविरोधात समाज माध्यमात आक्षेपार्ह, अश्लील पोस्ट केल्याप्रकरणी सोरतापवाडी (ता. हवेली) येथे आश्रय घेतलेल्या एका संशयिताला मुंबई सायबर ब्रँचच्या दक्षिण पथकाने अटक केली. मंगळवारी (दि. 12) रात्री उशिरा अल्ट्राटेक कंपनीकडे जाणाऱ्या एका मंगल कार्यालयाजवळून पोलिसांनी त्याला अटक केली.

आकाश डाळवे (वय 30) याला मोहोळ पोलीस ठाण्याच्या हद्दीतून ताब्यात घेण्यात आले. तर अविनाश पुकळे (वय 30) याला उरळी कांचन, जि. पुणे येथून अटक करण्यात आली आहे. दोन्ही आरोपींना आज गिरगाव येथील 18 व्या मेट्रोपॉलिटन कोर्टात हजर करण्यात येणार आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,



राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रूपाली चाकणकर यांच्याविरोधात फेसबुकवरील एका पेजवरून जाणीवपूर्वक आक्षेपार्ह पोस्ट वारंवार करण्यात येत होत्या. याप्रकरणी पोलिसांकडे तक्रार करण्यात आली होती. या घटनेचा तपास करीत असताना संशयित अविनाश पुकळे याने सोरतापवाडीत आश्रय घेतल्याची माहिती मिळताच पोलिसांनी सापळा रचून त्याला बेड्या ठोकल्या आहेत. या घटनेचा पुढील तपास सुरू आहे.

उरुळी कांचन परिसर हा कुख्यात गुन्हेगारांचा अड्डा राहिला आहे. या परिसरात नामचिन गुंडाची गुन्हेगारी संपली. मात्र, गुन्हेगारी कारवाया करणाऱ्या जिल्हा व जिल्ह्याबाहेरील गुन्हेगार मंडळींना मात्र या ठिकाणी आश्रय मिळत असल्याची परिस्थिती आहे. गुन्हेगारांना या ठिकाणी आश्रय मिळून सल्लागाराची भूमिका काही गुन्हेगार करीत आले आहेत. त्यामुळे राजाश्रय देणाऱ्यांची पाळेमुळे उखडून अशा स्थानिक गुन्हेगारांवर पोलिसांनी करडी नजर ठेवून त्यांना सहआरोपी करावे, अशी मागणी होत आहे.

# ठळक बातम्या

## सिंहगड : भिक्षेकऱ्यांमुळे नागरिक त्रस्त

**खडकवासला (आरंभ पर्व):** प्रचंड वाहतूक कोंडी होणाऱ्या सिंहगड रस्ता, एनडीए रस्त्यासह शहरातील इतर वर्दळीच्या मार्गांवर भीक मागणारे भिक्षेकरी, लहान मुले, पोतराज, तृतीयपंथी, बहुरूपींसह वयोवृद्धांकडून होणाऱ्या त्रासामुळे नागरिक हैराण झाले आहेत. रस्त्यांवर भीक मागण्यास मनाई असतानाही त्याची अंमलबजावणी केली जात नसल्याचे गंभीर चित्र यानिमित्ताने पुढे आले आहे. अलीकडच्या तीन-चार वर्षांत सिंहगड रस्त्यावर राजाराम पुलापासून खडकवासला धरण चौकापर्यंत शेकडो भिक्षेकारी रस्त्यावर उभे राहत आहेत. त्यामुळे वाहनचालक, पर्यटक आणि स्थानिक नागरिकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. रस्त्यांसह सार्वजनिक ठिकाणी तसेच घरोघरी भीक मागण्यास मुंबई अधिनियम 1959 कायद्यानुसार प्रतिबंध करण्यात आला आहे. तसेच भीक मागणाऱ्यांसाठी पुनर्वसन केंद्रही शहरासह राज्यात सुरू करण्यात आली आहेत.

असे असले तरी रस्त्यांवर भीक मागणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. शहर व उपनगरातील चौकाचौकांत सिग्नलजवळ भीक मागणारी लहान मुले, तृतीयपंथी, महिला, बहुरूपींसह वयोवृद्ध अचानक जमा होतात. वाहनांसमोर आडवे उभे राहून पैसे मागतात. कार, वाहनांचे दरवाजे न उघडल्यास जोरजोरात वाहनांच्या काचांना बुक्का मारतात. भीक मागणारे गाड्यांसमोर उभे राहून वाहतुकीला अडथळा निर्माण करतात.










# शिंदेंचा सत्कार दिल्लीत, मानापमान राज्यात

राज्याचे उपमुख्यमंत्री व शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे यांना नवी दिल्लीमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसचे संस्थापक अध्यक्ष, देशाचे माजी कृषी तसेच संरक्षणमंत्री शरद पवार यांच्या हस्ते 'महादजी शिंदे राष्ट्र गौरव पुरस्कारा'ने सन्मानित करण्यात आले. मुळात हा कार्यक्रम पूर्वनियोजित होता. तो घाईघाईने ठरविण्यात आला नव्हता. हा सत्कार कोणत्याही राजकीय पक्ष संघटनेकडून देण्यात आलेला नव्हता. या पुरस्काराचा निर्णय कोणत्या राजकीय संघटनेने घेतला नव्हता, तर नवी दिल्लीमध्ये साहित्य संमेलन आयोजित केलेल्या आयोजकांनी घेतला होता. त्यामागे तशी पार्श्वभूमीही होती. मुळात सत्कार कोणाचा करायचा आणि कोणाच्या हस्ते करायचा, हा निर्णय आयोजकांचा असतो, त्यामध्ये अन्य कोणी हस्तक्षेप करूच शकत नाही. शरद पवारांच्या हातून एकनाथ शिंदेंचा सत्कार झाला, त्यांना पुरस्कार देण्यात आला. यामध्ये उबाठा सेनेच्या प्रवक्त्याला आकांडतांडव करण्यासारखे काहीही नव्हते. हा विषय मुळातच साहित्य संमेलनाशी संबंधित आहे. हा काही महाविकास आघाडीचा कार्यक्रम नव्हता. त्यामुळे या कार्यक्रमावर टीकाटिप्पणी करण्याचा या प्रवक्त्याला कोणताही नैतिक अधिकार नव्हता. हा प्रवक्ता महाराष्ट्राच्या राजकारणात इतका मोठा नक्कीच झाला नाही की, महाराष्ट्राच्या राजकारणात भिष्माचार्य म्हणून अनेक दशके सक्रिय राजकारणात योगदान देणाऱ्या शरद पवारांना काय करावे आणि काय करू नये, याचा सल्ला देण्याइतपत प्रवक्त्याचे नक्कीच कर्तृत्वही नाही. एकनाथ शिंदे हे महादजी शिंदे यांच्या साताऱ्याच्या भूमीतून आले आहेत.

एकनाथ शिंदे यांनी काश्मीर आणि पंजाबमध्ये महाराष्ट्र सदन बांधण्यासाठी प्रयत्न केले. त्यांनी ज्याप्रकारे काही कामे केली आहेत, त्यामुळे एकनाथ शिंदे यांना महादजी शिंदे यांच्या नावाचा पुरस्कार देण्याचा निर्णय साहित्य संमेलनाचे आयोजन करणाऱ्यांनी घेतला आहे. साहित्य महामंडळ ही एक स्वायत्त संस्था आहे. साहित्य महामंडळ स्वायत्त संस्था असल्याने ते दरवर्षी संमेलन घेण्यासाठी वेगळ्या संस्थेला परवानगी देतात. यंदाचे मराठी साहित्य संमेलन सरहद संस्थेने आयोजित केले आहे. साहित्य संमेलनाच्या निमित्ताने पूर्व सत्कार ही परंपरा आहे. यावेळी महादजी शिंदे यांच्या नावाने पुरस्कार एकनाथ शिंदे यांना देण्यात आला. 'दिल्लीचेही तख्त राखतो महाराष्ट्र माझा', असे महाराष्ट्रात म्हटले जाते. ही कवी कल्पना ज्यांच्यामुळे अस्तित्वात आली, ते महादजी शिंदे होते. महादजी शिंदे यांच्या नावाने सुरुवातीला एखाद्या लष्करी व्यक्तीला पुरस्कार द्यायचे ठरले होते. मात्र, सदानंद मोरे यांच्यासारख्या अभ्यासकांनी महादजी शिंदे यांचा अभ्यास केल्यावर लक्षात आले की, महादजी शिंदे कवी होते, ते ओव्या आणि अभंग लिहायचे. त्यांनी दिल्लीत महाराष्ट्राची एक चांगली प्रतिमा निर्माण केली. त्यामुळे त्यांच्या नावाने पुरस्कार देण्याचा निर्णय साहित्य संमेलनाच्या आयोजकांनी घेतला. हा साहित्य संमेलन आयोजकांचा निर्णय असल्याचे शरद पवारांच्या हातून सत्कार करवून घेण्यात, पुरस्कार घेण्यात एकनाथ शिंदेंनीही आक्षेप घेतला नाही. कारण एकनाथ शिंदे हे एक सृजनशील व्यक्तिमत्त्व असून त्यांना काय करावे, काय करू नये याची प्रगल्भता, समज व उमजही आहे.

शरद पवार यांच्या हस्ते उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा 'महादजी शिंदे राष्ट्र गौरव



पुरस्कारा'ने सन्मान करण्यात आला. शरद पवार यांच्यासारख्या ज्येष्ठ आणि जाणत्या नेत्यांच्या हस्ते हा पुरस्कार मिळणे ही गौरवाची बाब आहे. पवार यांचे आपल्यासोबत चांगले संबंध आहेत, त्यामुळे ते मला भविष्यकाळात कधीही गुगली टाकणार नाहीत, असे मत यावेळी एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केले. प्रवक्त्याचा गेल्या काही महिन्यांतील कारभार हा 'उचलली जीभ आणि लावली टाळ्याला' अशा स्वरूपातला आहे. या कार्यक्रमावर आक्षेप घेताना त्यांनी गेल्या काही काळात राज्यात राजकारण विचित्र सुरू आहे. राज्यात कोण कोणाला टोप्या घालत आहे? हे समजून घ्यावे लागेल. राज्याचे सरकार ज्यांनी पाडले, बेईमानी केली त्यांच्या कार्यक्रमाला शरद पवार यांनी जायला नको होते, असा सूर आळविला आहे. यावरून महाराष्ट्राच्या राजकारणात कलगीतुरा सुरू झालेला आहे. शिवसेना आणि राष्ट्रवादीच्या नेत्यांनी, पदाधिकाऱ्यांनी प्रवक्त्यावर टीकेचे आसूड ओढताना प्रवक्त्याला त्याची जागा दाखवून देण्याचा प्रयत्न केला आहे. मुळातच राजकीय समंजसपणा, प्रगल्भपणा नसल्यावर वैचारिक दिवाळखोरीचे प्रदर्शन जगासमोर होणे स्वाभाविकच आहे. पवारांनी शिवसेना फोडणाऱ्यांचा सत्कार करणे असा प्रवक्त्याने मुद्दा मांडला असला तरी शिवसेनेच्या शंभूराज देसाई यांनी या मुद्द्याचे शवविच्छेदनच केले आहे. शिवसेना कोणीही फोडली नाही. चिन्ह आमच्याकडे आहे. सगळ्या गोष्टी समोर आल्या. मग कोर्टात असो किंवा मग निवडणूक आयोग असो..., मग पक्ष कुठे फोडला?, आम्ही विरुद्ध लढलो. त्यांच्यासोबत सरकार कोणी स्थापन केले, हे प्रवक्त्यानी बोलले पाहिजे, असा टोला शंभूराज देसाई यांनी लगावला. विधानसभा निवडणुकीनंतर भाजपा नेते व राज्याचे मुख्यमंत्री व उबाठा शिवसेनेमध्ये भेटीगाठी वाढीस लागल्या आहेत. उबाठाची नेतेमंडळी फडणवीसांच्या भेटीगाठी घेऊ लागले आहेत. पण या घडामोडींना काँग्रेस व राष्ट्रवादी काँग्रेसकडून कधीही आक्षेप घेण्यात आला नाही. कारण त्यांना सामाजिक, राजकीय उमज व समज आहे. साहित्य संमेलनाच्या सत्कार समारंभावर भाष्य करून प्रवक्त्याने आपल्यातील वैचारिक दिवाळखोरीचे प्रदर्शन केले आहे. साहित्य संमेलनासंबंधित कार्यक्रमाला राजकीय रंग देणे चुकीचे आहे. राजकीय मतभेद, वैमनस्य, वितुष्ठ, वाद यावर टीका करण्यासाठी अनेक व्यासपीठे उपलब्ध आहेत. राजकीय चर्चा करण्यासाठी, आरोप करण्यासाठी या कार्यक्रमाचा आधार घेणे चुकीचे आहे. या सत्कार समारंभावर उबाठा शिवसेनेकडून झालेल्या टीकेमुळे त्यांनी स्वत:चेच हसे करून घेतले आहे. दररोज उठायचे, आरोप करायचे आणि दिवसाची सुरुवात करायची, ही अलीकडच्या काळात प्रवक्त्याची कार्यप्रणाली बनली आहे. शरद पवारांनी कोणत्या कार्यक्रमाला उपस्थित राहायचे, कोणाचा सत्कार करायचा हा त्यांचा व्यक्तिगत प्रश्न आहे. शरद पवार हे महाराष्ट्राच्या राजकारणातील वटवृक्ष आहेत. गेली अनेक दशके त्यांनी महाराष्ट्राच्या तसेच दिल्लीच्या सक्रिय राजकारणात घालवली आहेत. विशिष्ठ जनाधार आजही त्यांच्या पाठीशी आहे. जनतेतून एकदाही निवडून न आलेल्या प्रवक्त्याची त्यांना सल्ले देण्याइतपत उंची अजून वाढलेली नाही. शरद पवारांना दिलेला सल्ला ही संतापजनक बाब असून राष्ट्रवादी व शिवसेनेकडून त्याची गंभीर दखल घेण्यात आली आहे. एकनाथ शिंदेंचा सत्कार दिल्लीत झाला असला तरी त्याचे पडसाद मात्र महाराष्ट्राच्या राजकारणात उमटू लागले आहेत.

# वधू-वर मेळावे समाजासाठी काळाची गरज

## खासदार भाऊसाहेब वाकचौरे

## पुण्यात चर्मकार समाजाचा राज्यस्तरीय वधु-वर मेळावा उत्साहात संपन्न

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

चर्मकार समाजाचा राज्यस्तरीय वधु-वर मेळावा काँग्रेस भवन, शिवाजीनगर येथे संपन्न झाला. सदर मेळाव्याची सुरवात संत शिरोमणी रोहिदास महाराज यांच्या प्रतिमेस पुष्पहार व दिप प्रज्वलन संत साहित्याचे गाढे अभ्यासक प्रा. रामदास आबणे व अखिल भारतीय रविदासीय धर्म संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष सुखदेव महाराज वाघमारे व इतर सामाजिक संस्थाचे पदाधिकारी यांच्या उपस्थितीत झाली. सदर प्रसंगी महाराष्ट्र राज्य महसुली कर्मचारी संघटनेचे अध्यक्ष, लक्ष्मीकांत पाचारणे, राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय उपाध्यक्ष सुदाम लोखंडे, पुणे



मनपा चे माजी अतिरिक्त आयुक्त विलास कानडे, संत देवजीबाबा मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष जर्नादन कुराडे, कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक नानासाहेब आबनावे, महाराष्ट्र जनरल कामगार युनियनचे उपाध्यक्ष सोमनाथ शिंदे, पुणे कॅन्टोंमेंट सह. बँकेचे संचालक अनिल आबनावे, सुवर्णयुग सह. बँकेचे संचालक सुनिल माने, दि पुना नागरी सह. पतसंस्थेचे उपाध्यक्ष कुमार काळे, पुणे शहर राष्ट्रीय चर्मकार महासंघाचे अध्यक्ष संतोष टोणपे रिपब्लिकन चर्मकार महासंघाचे संस्थापक अध्यक्ष संजुभाऊ बनसोड इत्यादी मान्यवरांनी उपस्थित राहुन मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाची सांगता शिर्डीचे लोकप्रिय खासदार भाऊसाहेब वाकचौरे साहेब यांनी समाजामध्ये विभक्त कुटूंब पध्दती आल्यामुळे वधु-वर मेळावे घेणे अत्यंत आवश्यक झालेले आहे. त्याचप्रमाणे सामुदायीक विवाह सोहळे आयोजित करणे गरजेचे झाले आहे. श्री संत शिरोमणी रविदास समाज विकास संस्था यांच्या मार्फत राज्य स्तरीय वधु-वर मेळावा निःशुल्क घेताला जातो हा एक स्तुत्य समाजिक उपक्रम आहे. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेव सुर्यवंशी कार्याध्यक्ष अशोक कांबळे, उपाध्यक्ष चंद्रकांत कांबळे, सचिव भालचंद्र गोरेगावकर खजिनदार वसंतराव कांबळे, सहसचिव भगवान मस्तुद, कायदेशिर सल्लागार ॲड. दशरथ बनसोडे व इतर सहकारी यांच्या वतीने दर महिण्याला विविध जिल्हा व तालुका पातळीवर वर्षभर मेळावे आयोजित केले जातात. सदर प्रसंगी कृषि उत्पन्न बाजार समितीचे संचालक नानासाहेब आबनावे यांनी सामुदायीक विवाह सोहळ्याची खासदार भाऊसाहेब वाकचौरे साहेब यांच्या विनंतीस मान देऊन मंगल कार्यालय व इतर सुविधा पुरविण्याचे जाहिर केले. मेळाव्यामध्ये १६२ वधु-वरांनी नोंदणी केली. या व्यतिरीक्त अनेक पालकांनी मुलामुलींची नावे नोंद केली.

भालचंद्र गोरेगावकर यांनी संस्थेच्या विविध सामाजिक कार्याची माहीती दिली.

संस्थापक अध्यक्ष सुखदेव सुर्यवंशी यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचा सन्मानचिन्ह शाल श्रीफळ व पुस्तक भेट देऊन सत्कार करण्यात आला. संस्थेचे उपाध्यक्ष चंद्रकांत कांबळे यांनी सर्व मान्यवरांचे आभार मानले व पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

# "देवमाणूस" साठी सज्ज व्हा!

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

तेजस देऊस्कर दिग्दर्शित आणि लव रंजन आणि अंकुर गर्ग निर्मित मल्टीस्टारर मराठी चित्रपट "देवमाणूस" ची प्रेक्षक आतुरतेने वाट पाहत आहेत आणि नुकतेच या चित्रपटात असलेल्या कलाकारांचे पोस्टर्स लॉंच करण्यात आलेत.




महेश मांजरेकर, रेणुका शहाणे, सुबोध भावे आणि सिद्धार्थ बोडके अशा ह्या दिग्गज आणि पॉवरहाऊस कलाकारांचे वैशिष्ट्य असलेले पोस्टर्स चाहत्यांना सिनेमात असलेल्या त्यांच्या प्रभावशाली स्वरूपाची एक झलक देतात जे नक्कीच उद्या रिलीज होणाऱ्या बहुप्रतिक्षित "देवमाणूस" टीझरच्या अपेक्षा वाढवतात. रिलीझ झालेल्या ह्या पोस्टर्स मध्ये आपण चित्रपटाच्या मुख्य पात्रांचे अतिशय मोहक फर्स्ट लुक पाहू शकतो. अभिनेते महेश मांजरेकर ह्यांचा खूपच साधा पण इंटेन्स लुक आपल्याला दिसून येतो, त्यांची भेदक नजर त्यांच्या या भूमिकेची गंभीरता सांगते. अभिनेत्री रेणुका शहाणे ह्यांचा मायाळू, सरळ देखावा आणि मनमोहक लुक लक्ष वेधून घेणारा आहे तर सुबोध भावे ह्यांना पोलिसांच्या हटके भूमिकेत पाहू शकतो तसेच अभिनेता सिद्धार्थ बोडके त्याच्या हसण्याने सिनेमाचं आणि त्याच्या भूमिकेचं रहस्य वाढवतो.

# राष्ट्रसेवा समुह : प्रबोधनपर कार्यक्रमाचे आयोजन



राष्ट्रसेवा समूह



**धायरी (दै. आरंभ पर्व)**

सालाबादप्रमाणे 19 फेब्रुवारी रोजी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त सर्वांचे आकर्षण असणाऱ्या धायरीतील राष्ट्रसेवा समूहाच्या शिवजन्मोत्सव सोहळा यंदा लक्षवेधी होणार आहे. ह्या शिवजयंती सोहळ्याच्या निमित्ताने विविध प्रबोधन पर कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आल्याची माहिती राष्ट्रसेवा समूहाचे संस्थापक अध्यक्ष, राहुलभाऊ पोकळे यांनी दै. आरंभपर्वला दिली. पुढे बोलताना त्यांनी कार्यक्रमाची माहिती दिली.गेल्या अनेक वर्षापासून शिवजन्मोत्सव सोहळ्याची राष्ट्र सेवा समूहाची परंपरा याही वर्षी कायम राहणार आहे. ह्यामध्ये रविवार दि.16 रोजी सायं.७.००वाजता संगीत भारूड हा कार्यक्रम होणार आहे. ह्या कार्यक्रमात झी टॉकीज फेम ह.भ.प संतोष महाराज पुजारी कडवेकर व सहकलाकार यांच्या साथीने ही संगीत भारूड होणार आहेत. सोमवार दिनांक 17 रोजी सायंकाळी सात वाजता किर्तन सोहळ्यामध्ये राष्ट्रीय कीर्तनकार ह भ प माऊली महाराज वाबळे यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. दिनांक मंगळवार 18 फेब्रुवारी रोजी भाग्यवान जिजाऊ/कृतज्ञता सोहळा हा कार्यक्रम होणार आहे. 19 फेब्रुवारी शिवजयंती उत्सव निमित्त दरवर्षीप्रमाणे पारंपरिक पद्धतीने व पालखीतून ढोल ताशांच्या गजरामध्ये भव्यदिव्य शिव मिरवणूक पार पडणार आहे. ही मिरवणूक रायकर नगर ते धायरी गाव अशी निघणार आहे.हे सर्व प्रबोधनपर कार्यक्रम सर्व विविध कार्यक्रमांचे आयोजन काळभैरवनाथ मंदिर पटांगण, पवळी चौक धायरी येथे होणार आहेत. छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित्त होणाऱ्या या सर्व कार्यक्रमांना सर्व शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन राष्ट्रसेवा समूहाचे संस्थापक अध्यक्ष राहुलभाऊ पोकळे, जिजाऊ महिला महासंघाच्या अध्यक्षा स्मिताताई पोकळे यांनी केले आहे.

# टेनिस व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडियाची २०२५-२९ निवडणूक संपन्न

## लक्ष्मण साबळे

- **टेनिस व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडिया राष्ट्रीय अध्यक्षपदी कर्नाटकच्या नागेश्वर राव यांची निवड**




**नवीन कार्यकारिणीने कार्यभार स्वीकारला. इतर सबसमित्यांवरील पदाधिकाऱ्यांच्या नेमणुका केल्या. विकास समिती अध्यक्ष सुरेश रेड्डी, डिसिप्लीन समिती धमेंद्रसिंह जडेजा, महिला समिती, खेळाडू कल्याण समिती, तांत्रिक समिती, पंच समिती, कार्यक्रम समिती, प्रसिद्धी समिती इ. शेवटी माजी सचिव डॉ. रितेश वांगवाड यांनी आभार मानले. निवडणूक प्रक्रिया कोणत्याही तक्रारीविना व शांततेत पार पाडल्याने सर्व सदस्य उत्साहात व आनंदात जल्लोष करीत गेले.**

**- डॉ. व्यंकटेश वांगवाड, संस्थापक व नोडल ऑफिसर**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रविवार दि.९ फेब्रुवारी रोजी टेनिस व्हॉलीबॉल फेडरेशन ऑफ इंडिया निवडणूक प्रक्रिया पार पडली. ह्यामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी रमेश शेलार यांनी काम पाहिले. भारतातील २० राज्यांचे ४० प्रतिनिधी हजर होते. प्रत्येक राज्य संघटनेचे दोन प्रतिनिधींना मतदार करण्याचा अधिकार होता.आणि मागील ४ वर्षांची मुदत संपल्यामुळे घटनेप्रमाणे निवडणूक घेणे बंधनकारंक होते. श्री शिवछत्रपती क्रीडा संकुलात बालेवाडीच्या सभागृहात सकाळी ९ ते१ वाजेपर्यंत ही प्रक्रिया पार पडली यात सर्व सहमतीने पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली, यामधे.. अध्यक्ष म्हणून नागेश्वर राव, कर्नाटक निवडले गेले. तर सचिब म्हणून प्रा. रणजित चामले, पुणे

तसेच कोषाध्यक्ष म्हणून तृषाली बारिया, गुजरात

याशिवाय उपाध्यक्ष म्हणून प्रियानंदा एन., मणिपूर, प्रतापसिंह, गुजरात यांची निवड झाली आणि शशिकांता नायक, ओरिसा यांच निवड झाली.

तसेच सहसचिव म्हणून क्रमाने एस सांबा शिवा राव आ. प्र., सुरेश रेडी महाराष्ट्, ब्रजेश प्रसाद झारखंड, प्रदीप केशवानी मध्य प्रदेश या चार जणांची निवड झाली

तर सदस्य म्हणून निहारिका सियात गुजरात, आर. विजय तामिळनाडु, जयशंकर गुप्ता बिहार, जी. जी. एस. वाराप्रसाद तेलंगाणा, निकिता दिल्ली, सुशमा राय कर्नाटक, जॉन अम्ब्रोस पाँडेचरी, वंदना कुमारी बिहार या ८ जणांची निवड झाली आहे.

क्रीडा मंत्रालयाच्या आदेशाने नोडल अधिकारी म्हणून संस्थापक डॉ. व्यंकटेश वांगवाड यांची नेमणूक करण्यात आली. कार्यकारिणी निवड संपल्यावर मागील कार्यकारिणीचे अध्यक्ष व सचिव आनंद खरे व डॉ. रितेश वांगवाड यांनी नवीन निवडलेल्या पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. तसेच निवडणूक अधिकारी रमेश शेलार यांनीही नवीन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले. डॉ. व्यंकटेश वांगवाड यांनी नवीन कार्यकारिणीला संबोधित करून पुढील कार्यासाठी शुमेच्छा दिल्या. अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात ही निवड प्रक्रिया पार पडली.

# थोडक्यात



## वर्ल्ड ट्रॅव्हल अँड टुरिझ्म कार्निवल जल्लोषात संपन्न !

**पुणे - लक्ष्मण साबळे (आरंभ पर्व) : World Travel and Tourism Carnival 2025 8 फेब्रुवारी रोजी IIBM group of Institute च्या पिंपरी येथील जेट इंडिया कॉलेज कॅम्पस मध्ये जल्लोषात पार पडला. या कार्निवल मध्ये सांस्कृतिक कार्यक्रम आणि जगातील पर्यटन स्थळांची प्रतिकृती पालकांना व विद्यार्थ्यांना बघायला मिळाली.या कार्निवलच उद्‌घाटन नगरसेविका मीनल यादव, वैशाली काळभोर आणि केंब्रीज ग्रुप ऑफ स्कूलचे संस्थापक अध्यक्ष धनंजय वर्णेकर यांच्या हस्ते झाले. यावेळी बोलताना Jet India संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीन वस्तानी म्हणाल्या "या कार्निवलचा मूळ उद्देश जगाती वेगवेगळे देश व प्रेक्षणीय स्थळ जी अजून विद्यार्थ्यांना व पालकांना माहिती नाहीयेत या कार्निवल मुळे माहित नसलेले पर्यटन स्थळ विद्यार्थ्यांना व पालकांना माहीत झाली. त्यापुढे बोलताना म्हणाल्या हा कार्निवल आम्ही गेले सोळा वर्ष करत आहोत यावर्षी चाळीसहून अधिक कॉलेजेस चे प्रिन्सिपल आणि टीचर्स यांनी या कारणीवला भेट दिली. केंब्रिज ग्रुप ऑफ स्कूलचे संस्थापक अध्यक्ष धनंजय वर्णेकर म्हणाले सध्या सर्विस इंडस्ट्री मध्ये खूप जास्त संधी उपलब्ध आहेत आणि येणाऱ्या काळात त्या अजून वाढणार आहेत. जेट इंडिया संस्थेमार्फत खूप चांगल्या प्रकारचे विद्यार्थी तयार होत आहेत. जेट इंडियाच्या विद्यार्थ्यांचं भविष्य खूप उज्वल आहे. अत्यंत उत्साहात हा कार्यक्रम संपन्न झाला.**



## रामदरा रस्त्याचे डांबरीकरण सुरू; गतिरोधकाची उंची कमी करण्याची मागणी

**लोणी काळभोर (आरंभ पर्व) : हवेली तालुक्यातील पर्यटन स्थळ म्हणून नावारूपाला आलेले रामदरा शिवालयाकडे जाणाऱ्या रस्त्याचे डांबरीकरण सुरु झाले असुन स्थानिक नागरिकांनी व भाविकांनी याबाबत समाधान व्यक्त केले आहे . रामदरा शिवालयाकडे जाणाऱ्या रस्त्याचे काम बरेच दिवस डांबरीकरण रखडले होते . खडीकरण झाल्यानंतर डांबरीकरण सुध्दा बरेच दिवस रखडले होते .त्यामुळे नागरिकांना व भाविकांना बराच त्रास सहन करावा लागत होता .परंतु आता डांबरीकरण सुरू झाल्याने अनेक प्रश्न मार्गी लागले आहेत .परंतु डांबरीकरण करताना जागोजागी जे गतिरोधक केले आहेत .ते अधिक उंचीचे असून जाताना व येताना याचा खूपच त्रास होत असल्याचे भाविकांचे म्हणणे आहे. तसेच त्याची उंची कमी करून त्यावर पांढरे पट्टे मारणे आवश्यक आहे. त्यामुळे ते गतिरोधक लवकर दिसून गाडीचा वेग कमी करता येणे शक्य होणार आहे. डांबरीकरण करताना जास्तीत जास्त गतिरोधक केले असून वाहन चालकांना याचा त्रास होताना दिसत आहे. तसेच साईट पटयाची कुठलीच सुविधा येथे दिसत नाही .परंतु डांबरीकरण होतेय म्हणून नागरिक व भाविकांना याचा आनंद होत आहे .**







# अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप यांचा वाढदिवस उत्साहात साजरा

## हजारो नागरिकांच्या उपस्थितीत संगीत सुरात वाढदिवस साजरा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

हक्काचा माणूस म्हणून ओळख असलेले पुणे महानगरपालिकेचे माजी उपमहापौर अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप यांचा वाढदिवस उत्साहात साजरा करण्यात आला.

हिंगणे चौक येथे आयोजित अभिष्टचिंतन सोहळ्यासाठी मान्यवरांसोबत नागरिकांनी मोठी गर्दी करत अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.

उपस्थित नागरिकांनी प्रसन्नदादा जगताप यांनी आवाहन केल्याप्रमाणे शालेय साहित्य, वह्या नागरिकांनी भेट म्हणून त्यांना दिल्या. अ‍ॅड प्रसन्नदादा जगताप यांना वाढदिवसाच्या निम्मित राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ ,प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, कार्याध्यक्ष रवींद्र चव्हाण, मंत्री चंद्रकांत दादा पाटील, राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी दूरध्वनीद्वारे शुभेच्छा दिल्या.

अ‍ॅड प्रसन्नदादा जगताप यांच्या वाढदिवसानिमित्त संगीत मैफिल, भव्य महा आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हजारो नागरिकांनी त्याचा लाभ घेतला.

ह्यामध्ये सर्व प्रकारच्या आरोग्य तपासण्या, नेत्र तपासणी करण्यात आली. चष्मे वाटप करण्यात आले..

याशिवाय अभिष्टचिंतन सोहळ्यास अजून नागरिकांनी उपस्थित राहून अ‍ॅड.प्रसन्नदादा जगताप यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या. दादांना राजकीय क्षेत्रामध्ये आणखी मोठी संधी मिळावी अशा इच्छाही उपस्थित नागरिकांनी बोलून दाखवल्या. सर्व क्षेत्रातील मान्यवर व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अ‍ॅड . प्रसन्नदादा जगताप यांच्या वाढदिवसाच्या निमित्त महाआरोग्य शिबिर आयोजित करण्यात आले होते. ह्या निमित्त येणाऱ्या नागरिकांना नाश्त्याची चांगली सोय करण्यात आली.

याशिवाय वाढदिवसाच्या अभिष्टचिंतन पुढे येणाऱ्या सर्व नागरिकांच्या जेवणासाठी सरुची भोजनाची सोय उपलब्ध करण्यात आली.

अ‍ॅड प्रसन्नदादा जगताप यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा देण्यासाठी सामाजिक कार्यकर्ते दिलीपदादा नवले, माजी नगरसेवक हरिदास चरवड, खडकवासला भाजप अध्यक्ष सचिन मोरे, राजाभाऊ कदम, नानासाहेब राऊत, यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर तसेच नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.


### दादांना मोठी संधी मिळावी : नागरिकांची अपेक्षा

**अ‍ॅड प्रसन्नदादा जगताप यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यासाठी सिंहगड रोड परिसरासह इतर भागातील नागरिक ही मोठ्या संख्येने उपस्थित होते. ह्या निम्मित अनेक नागरिकांनी दादांना मोठी संधी मिळावी अशी अपेक्षा व्यक्त केली. आतापर्यंत त्यांनी केलेले काम आणि काम करण्याची जिद्द पाहता त्यांना आणखी मोठी संधी मिळाली पाहिजे अशी अपेक्षा ही व्यक्त केली. अ‍ॅड .प्रसन्नदादा जगताप यांनी केवळ प्रभाग न पाहता सर्व लोकांची कामे करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे साहजिकच जनतेचे चांगले प्रेम त्यांना आहे. त्यामुळेच नागरिकांनाही त्यांच्याकडून खूप अपेक्षा आहे हे दिसून येते.**




### जनतेसाठी सदैव कटीबद्ध : अ‍ॅड. जगताप

**वाढदिवसाच्या निमित्त संवाद साधताना त्यांनी जनतेसाठी आपण कायमच कटिबद्ध राहणार आहोत. त्यांच्या प्रश्न सोडवणे हेच माझे कर्तव्य समजून काम केले आहे. याही पुढे अशीच जनसेवा करणार आहे. आज जवळपास साडेतीन हजार नागरिकांची आरोग्य तपासणी झाली. यात सर्वांच्या चेहऱ्यावरील आनंद हाच मला आशीर्वाद वाटतो. वाढदिवस हे फक्त निमित्त आहे.पुढे जनहितार्थ काम करणार आहे. असा आशावाद अ‍ॅड प्रसन्नदादा जगताप यांनी व्यक्त केला. वाढदिवसाच्या शुभेच्छा बद्दल त्यांनी सर्वांचे आभार मानले.**




**पुण्याचे माजी उपमहापौर अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप यांना वाढदिवसाच्या निमित्त दैनिक आरंभपर्व चा विशेषांक देण्यात आला. निवासी संपादक लक्ष्मण साबळे यांनी हा अंक अ‍ॅड. प्रसन्नदादा जगताप यांना दिला.**

## वानखेडे स्टेडियमची तेजोमयता

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

देशाच्या क्रीडा पायाभूत सुविधांमध्ये नवसंजीवनी आणणाऱ्या बजाज लाइटिंगने प्रतिष्ठित वानखेडे स्टेडियममध्ये अत्याधुनिक एलईडी तंत्रज्ञान स्थापित करून एक नवा मानदंड प्रस्थापित केला आहे. स्टेडियमच्या सुवर्ण महोत्सवी वर्षात झालेल्या या परिवर्तनामुळे वानखेडे आता जागतिक दर्जाचे क्रिकेट स्थळ म्हणून अधिक सक्षम झाले आहे. २ फेब्रुवारी २०२५ रोजी भारत विरुद्ध इंग्लंड टी२० सामन्यादरम्यान या नव्या प्रकाशयोजनेचे शानदार अनावरण झाले.‘बिल्ट टू शाइन’या आपल्या तत्त्वज्ञानानुसार बजाज लाइटिंगने उच्च दर्जाच्या स्टेडियम लाइटिंगसाठी नवा मापदंड निर्माण केला आहे, जो प्रेक्षकांना अप्रतिम दृश्य अनुभव देण्यासोबतच ऊर्जा कार्यक्षमतेत मोठी भर घालतो.




- **वानखेडे स्टेडियममध्ये बजाज लाइटिंगच्या क्रांतिकारी एलईडी परिवर्तनाने नवीन युगाची सुरुवात**

परंपरागत लाइट्सच्या जागी १६५०W क्षमतेचे ४४८ एलईडी फ्लडलाइट्स बसवण्यात आले आहेत, जे आंतरराष्ट्रीय HDTV प्रसारण मानकांनुसार उत्कृष्ट प्रकाश वितरण करतात.

## क्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे चषकाचा मानकरी!

### बंधुत्व मित्र मंडळ क्रिकेट क्लब

**बिबवेवाडी (दै. आरंभ पर्व)**

लहुजी शक्ती सेना महाराष्ट्र राज्य आयोजित "आद्य क्रांतीगुरु लहुजी वस्ताद साळवे चषक""भव्य सिंगल टेनिस बॉल हाप पीच क्रिकेट स्पर्धा 2025'ही बिबवेवाडी भागातील सुपर या ठिकाणी असणाऱ्या पाण्याच्या टाकी जवळील मैदानावर आयोजित करण्यात आली . यात अनेक नामांकित संघाने सहभाग नोंदवला होता. गेले तीन दिवस स्पर्धा मोठ्या दिमाखात आयोजन कर्त्यांनी यशस्वीरित्या चालवली. रविवार दिनांक 9/2/25 रोजी फायनल होती. सुट्टीचा दिवस असल्यामुळे मैदान प्रेक्षकांनी तुडुंब भरलेले होते. बंधुत्व क्रिकेट क्लब व ऋषी दादा मगर या संघात फायनल झाली. या अटीतटीच्या सामन्यात प्रथम ऋषी दादा मगर या संघाने फलंदाजी करताना दोन षटकात 13 धावा केल्या. व या धावा रोखण्यास बंधुत्व क्रिकेट क्लब या संघास यश आले. अखेर बंधुत्व क्रिकेट क्लब ने 4 बॉल राखून व 14 धावा करून विजय नोंदवला.प्रथम क्रमांकाचे रोख रू.55,555 व चषक या वर आपले नाव कोरले. स्थानिक संघ म्हटल्यास बंधुत्व मित्र मंडळाचे अनेक छोटे-मोठे कार्यकर्ते पाहण्यास आले होते. व मैदानावर त्यांनी मोठा विजयी जल्लोष साजरा केला. यामध्ये संघमालक म्हणून विश्वजीत कवडे व नारायण ओव्हाळ व सर्वांचा आवडता गोपी अर्थात अमर आरवलकर यांनी उत्कृष्ट संघ बांधला व स्वतः सहभागी नोंदवला. तसेच या संघातील स्टार खेळाडू व स्वतः कॅप्टन रोहन बोबडे यांनी अष्टपैलू खेळ करताना दोन ओव्हर च्या फायनल मध्ये एक ओव्हर मध्ये हॅट्रिक घेऊन फक्त तीन रन्स देऊन विजय मिळवण्यास मोठा हातभार लावला. व तसेच प्रत्येक मॅच मध्ये त्यांनी उत्कृष्ट खेळ दाखवल्याने त्याला मॅन ऑफ द सिरीज मिळाली.

बंधुत्व मित्र मित्र मंडळाने या आपल्या संघाचे जोरदार स्वागत केले, व मोठा आनंद साजरा केला. ह्या यशाबद्दल बंधुत्व मित्र मंडळ क्रिकेट क्लबचे परिसरातील सर्व मान्यवर आणि स्वागत केले आहे.



## थोडक्यात



### सुबोध आणि मानसी यांच्या सकाळ तर होऊ द्या चित्रपटाची घोषणा!

**पुणे (आरंभ पर्व) : मराठी चित्रपटसृष्टीचा विस्तार दिवसेंदिवस वाढत आहे. विषय, मांडणी आणि शीर्षक यामुळे मराठी चित्रपट जगभरातील प्रेक्षकांना आकर्षित करण्यात यशस्वी ठरत आहेत. यामुळे हिंदीतील नामांकित निर्मातेही मराठी सिनेमाकडे वळताना दिसत आहेत. याच पार्श्वभूमीवर, ‘सकाळ तर होऊ द्या’ या अनोख्या शीर्षकाच्या आगामी चित्रपटासाठी हिंदीतील नामवंत तंत्रज्ञ एकत्र आले आहेत. सुप्रसिद्ध अभिनेते सुबोध भावे आणि मानसी नाईक यांच्या मुख्य भूमिका असलेल्या या चित्रपटाच्या चित्रीकरणाला मध्यप्रदेशात सुरुवात झाली आहे. ‘सकाळ तर होऊ द्या’ हा चित्रपट श्रेय पिक्चर्स कंपनीच्या बॅनरखाली तयार होत आहे. या चित्रपटाची निर्मिती नम्रता सिन्हा यांनी केली असून, त्यांनी अनेक लोकप्रिय टीव्ही मालिका आणि वेबसीरिजची निर्मिती केली आहे. तसेच, त्या सुप्रसिद्ध चित्रपट निर्माते विनय सिन्हा यांच्या कन्या आहेत. ज्यांनी ‘अंदाज अपना अपना’ आणि ‘नसीब’ यांसारख्या अनेक अजरामर हिंदी चित्रपटांची निर्मिती केली आहे. आता नम्रता सिन्हा यांनी ‘सकाळ तर होऊ द्या’ या चित्रपटाद्वारे मराठी सिनेसृष्टीत पदार्पण केले आहे. चित्रपटाचे लेखन व दिग्दर्शन आलोक जैन यांनी केले आहे. त्यांनी यापूर्वी हिंदीतील दिग्गज दिग्दर्शक मनोज कुमार आणि ऋषी कपूर यांच्यासोबत काम केले आहे. चित्रपटातील संवाद लेखक ओंकार बर्वे आहेत. तर, सिनेमॅटोग्राफीची जबाबदारी सुनील पटेल यांनी सांभाळली आहे. त्यांनी ‘सरफरोश’, ‘रेडी’, ‘हम तुम’, ‘मेरे यार की शादी है’, ‘बँग बँग’ यांसारख्या अनेक लोकप्रिय चित्रपटांचे छायांकन केले आहे. मराठी चित्रपटसृष्टीत नवे पर्व घेऊन येणाऱ्या ‘सकाळ तर होऊ द्या’ च्या चित्रीकरणाला महाराष्ट्राबाहेर, मध्यप्रदेशातील अप्रत्यक्षित आणि अद्याप न पाहिलेल्या लोकेशन्सवर सुरुवात झाली आहे.**

## शिवाजीनगर एस. टी बस स्थानकाच्या धर्तीवर स्वारगेट बसडेपो व मेट्रो स्थानक विकसित करणार

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

शिवाजीनगर येथील बस स्थानक विकसित करण्यासाठी महा मेट्रो व राज्य परिवहन महामंडळ यांच्यामध्ये सामंजस्य करार झाला होता त्या अनुषंगाने हे बस स्थानक विकसित होत आहे याच धर्तीवर स्वारगेट येथील बस स्थानक व मेट्रो स्थानक ही विकसित करावे अशा सुचना राज्याचे परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केल्या याबाबत तात्काळ प्रस्ताव सादर करण्याचे उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री पुणे अजित पवार व परिवहन मंत्री श्री प्रताप सरनाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सादर करण्याचे निर्देश त्यांनी दिले



बाधा, वापरा, हस्तांतरण करा यानुसार शिवाजीनगर (पुणे) बसस्थानक विकसित करण्यात आले आहे याच अनुषंगाने आज मंत्रालयात आढावा बैठक घेण्यात आली यावेळी हे काम तात्काळ पुर्ण करण्याबाबत सुचना राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुणे पालकमंत्री अजित पवार यांनी दिले. या बैठकीला परिवहन मंत्री प्रताप सरनाईक, आमदार सिद्धार्थ शिरोळे,

नवि विभाग अ.मु.स. असिम गुप्ता ,पुणे महा मेट्रोचे व्यवस्थापकीय संचालक श्रावण हार्डीकर तसेच राज्य परिवहन महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक माधव कुसेकर हे उपस्थित होते.

या बैठकीमध्ये राज्यमंत्री माधुरीताई मिसाळ यांनी शिवाजीनगर बस स्थानकाच्या धर्तीवर स्वारगेट येथील बस स्थानक व मेट्रो स्थानक विकसित करण्याबाबत सूचना केल्या त्याला राज्याचे उपमुख्यमंत्री तथा पुण्याचे पालकमंत्री अजितद पवार व परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी तत्वतः मान्यता दिली व संबंधितांना आठ दिवसाच्या आत प्रस्ताव सादर करण्याचे सांगितले ज्याप्रमाणे शिवाजीनगर येथील बस स्थानकात दोन तळघर चारचाकी वाहन बस स्थानकाचा तळमजला व व्यावसायिक साठी शॉपिंग मॉल आहेत त्याचप्रमाणे स्वारगेट येथील बस स्थानकात अशा प्रकारच्या सुविधा असाव्यात अशा सूचना यावेळी राज्याचे परिवहन राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी केले पुणे महा मेट्रो व महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ दोघांच्या समन्वयातून ही सुंदर व सर्व सोयींनी युक्त अशी इमारत लवकरच उभी राहील अशी ग्वाही यावेळी राज्यमंत्री माधुरी मिसाळ यांनी दिली.

## 5G फिक्स वायरलेस ॲक्सेस डिव्हाइसच्या विस्तारासाठी एअरटेल आणि नोकियाचा करार

# देशभरात सर्वोत्तम गतीची इंटरनेट सुविधा पुरविणार

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

भारतातील कोट्यवधी लोकांना वेगवान इंटरनेट सेवा मिळावी यासाठी भारती एअरटेलने नोकिया आणि क्वालकॉमसोबत 5G फिक्स वायरलेस ॲक्सेस डिव्हाइसच्या विस्तारासाठी आणि वाय-फाय सुविधांसाठी करार केला आहे. या करारांतर्गत नोकिया एअरटेलला 5G फिक्स वायरलेस ॲक्सेस गेटवे रिसीव्हर आणि वाय-फाय 6 प्रणाली पुरवणार आहे. या उपकरणांमध्ये क्वालकॉम मॉडेम-आरएफ आणि वाय-फाय 6 चिपसेट्स वापरण्यात आले असून, यामुळे फायबर इंटरनेट दुर्लभ असलेल्या किंवा अंमलबजावणी करण्यास कठीण असलेल्या कानाकोपऱ्यात देखील दर्जेदार ब्रॉडबँड सेवा मिळणार आहे. भारतासारख्या मोठ्या देशात फायबर इंटरनेट सर्वत्र पोहोचवणे कठीण आहे. त्यामुळे 5G फिक्स वायरलेस ॲक्सेस हा चांगला पर्याय ठरतो. हे वायरलेस उपकरण फायबर इंटरनेटसारखाच वेग देतात, त्यामुळे इंटरनेट सेवा हवी तिथे आणि सहज उपलब्ध होऊ शकते.




भारतात फायबर इंटरनेटचा कमी विस्तार आणि डिजिटल सेवांची मोठी मागणी असल्यामुळे, 5G नेटवर्कच्या माध्यमातून स्थिर वायरलेस ब्रॉडबँड सुविधा हा 5G तंत्रज्ञानाचा एक महत्वपूर्ण विनियोग ठरतो.

एअरटेल नोकियाच्या फास्टमाईल 5G आउटडोअर रिसीव्हरचा उपयोग करणार आहे, जो मल्टी-ड्वेलिंग युनिटसाठी डिझाइन करण्यात आला असून एकाच वेळी दोन घरांना सेवा पुरवण्यास सक्षम आहे, त्यामुळे इंटरनेट जोडणीसाठी येणारा खर्च कमी होईल. या रिसीव्हर्समध्ये उच्च गतीचे सिग्नल पकडणारे अँटेना आहेत, जे रेडिओ संसाधनांचे कार्यक्षम व्यवस्थापन करत विस्तारित अंतरावर ब्रॉडबँड इंटरनेटची सर्वोत्तम सेवा देतात. याशिवाय, फास्टमाईल 5G आउटडोअर रिसीव्हर पॉवर-ओव्हर-इथरनेट तंत्रज्ञानाचा वापर करतो, ज्यामुळे भिंती, बाल्कनी किंवा खांबावर ते सहजपणे बसवता येतात.

एअरटेल ग्राहकांच्या घरगुती इंटरनेट सुविधेच्या अनुभवात सुधारणा करण्यासाठी नोकियाची वाय-फाय 6 प्रणाली बसवणार आहे. ही प्रणाली वाय-फाय सिग्नल घराच्या प्रत्येक कोपऱ्यात समान ताकदीने पोहोचवेल त्यामुळे घराच्या कोणत्याही कोपऱ्यात सिग्नलची समस्या येणार नाही. तसेच ही प्रणाली इंटरनेट सेवेतील अडथळे आपोआप ओळखून वेग वाढवत स्थिर इंटरनेट सेवा देते. ज्यामुळे ग्राहकांना त्यांच्या संपूर्ण घरात उत्कृष्ट ब्रॉडबँड इंटरनेटचा अनुभव मिळेल. नोकियाची ही दोन्ही उपकरणे भारतातच उत्पादित केली जाणार असून पर्यावरणपूरक पॅकेजिंगमध्ये पुरविली जातील.

या कराराबद्दल भारती एअरटेलचे मुख्य तंत्रज्ञान अधिकारी रणदीप सेखों म्हणाले,-“नोकिया आणि क्वालकॉमसोबत ही भागीदारी आमच्या ग्राहकांना उत्कृष्ट नेटवर्क अनुभव देण्याच्या आमच्या वचनबद्धतेचा भाग आहे. नोकियाच्या 5G फिक्स वायरलेस ॲक्सेस आणि वाय-फाय 6 प्रणाली आम्हाला दुर्गम भागातही वेगवान आणि सर्वोत्तम अखंडित इंटरनेट सेवा देण्यास मदत करतील याची आम्हाला खात्री आहे."

“भारतातील मोठे क्षेत्रफळ आणि लोकसंख्येची घनता ब्रॉडबँड कनेक्टिव्हिटीसाठी अनोखी आव्हाने निर्माण करतात. फायबर इंटरनेट सेवा सुरू करणे जिथे कठीण आहे, तिथे फिक्स वायरलेस ॲक्सेस वापरून विश्वासार्ह वायरलेस ब्रॉडबँड इंटरनेट सुविधा उपलब्ध करता येऊ शकते.

क्वालकॉम टेक्नॉलॉजीजच्या सहकार्याने विकसित केलेल्या आमच्या 5G फिक्स वायरलेस ॲक्सेस आणि वाय-फाय 6 प्रणालीच्या मदतीने, भारती एअरटेल त्यांच्या ग्राहकांना आजच्या आधुनिक डिजिटल अर्थव्यवस्थेसाठी अत्यावश्यक असलेली इंटरनेट सेवा सर्वोत्तम वेगाने देऊ शकणार आहे. अधिकाधिक नागरिकांना उच्च-गती ब्रॉडबँड इंटरनेट सेवेशी जोडण्याच्या भारती एअरटेलच्या दृष्टिकोनाला पाठिंबा देण्यास आम्ही उत्सुक आहोत, असे नोकियाचे फिक्स्ड नेटवर्कचे अध्यक्ष सँडी मोटली म्हणाले.

## थोडक्यात



### धावत्या एसटी बसमध्ये खून खटल्यात आरोपीला जन्मठेपेची शिक्षा

- राजगुरुनगर सत्र व जिल्हा न्यायालयाचा निकाल

राजगुरुनगर-किरण खुडे (आरंभ पर्व) : साडेसहा वर्षांपूर्वी धावत्या एसटी बसमध्ये घडलेल्या खून प्रकरणाच्या खटल्यात येथील सत्र व जिल्हा न्यायाधीश एस पी. पोळ यांनी आरोपी अजित भगवान कान्हुरकर (वय ४० रा. दावडी, ता. खेड) यास दोषी धरून आजन्म जन्मठेप आणि दंडाची शिक्षा सुनावली. या संवेदनशील खून खटल्यात विशेष सरकारी वकील सागर कोठारी यांचा युक्तिवाद ग्राह्य धरत आरोपीला शिक्षा सुनावली. या प्रकरणाची हकीकत अशी कि, आरोपी अजित भगवान कान्हूरकर याचे मामाचे मोठ्या मुलीवर एकतर्फी प्रेम होते. मात्र या एकतर्फी प्रेम प्रकरणास तरुणीचा आणि तिच्या कुटुंबियांचा विरोध होता. अनेकवेळा समजावून देखील अजित मुलीला व मामाच्या कुटुंबाला त्रास देत होता म्हणून अजित विरुद्ध अनेक पोलीस तक्रारीही झाल्या होत्या. अजित त्यामुळे चिडून होता आणि त्याच रागापोटी मामाचे खानदान संपवायचे ह्या उद्देशाने दि. १२/०६/२०१८ रोजी पाळत ठेवून तो मामाचा मुलगा ज्या बसने शाळेत जातो त्या बसमध्ये आधीच जावून बसला. मामाचा मुलगा श्रीनाथ खेसे सकाळी ७.२० वाजता बस मध्ये बसल्यानंतर बस खेसे वस्तीतून ५०० मीटर पुढे गेल्यावर दबा धरून बसलेल्या आरोपी अजितने श्रीनाथच्या बहिणीसमोर श्रीनाथवर धावत्या बसमध्ये पाठीमागून सपासप डोक्यात कोयत्याने १८ वार केले. त्यात श्रीनाथच्या मेंदूचा अक्षरशः भुगा झाला. आणि तो जागेवरच कोसळून मृत्यू पावला.



### एमआयटी-एडीटीला 'खेलो इंडिया'साठी 'साई'ची मान्यता

- रोइंग या क्रीडा प्रकारासाठी निवड होणारे राज्यातील एकमेव विद्यापीठ

लोणी काळभोर (आरंभ पर्व) : येथील एमआयटी आर्ट, डिजाईन आणि टेक्नॉलॉजी विद्यापीठाला रोइंग या क्रीडा प्रकारासाठी प्रतिभावान खेळाडूंचा (मुले व मुली) शोध घेणे व त्यांना प्रशिक्षण देण्यासाठी भारतीय क्रीडा प्राधिकरण (साई) कडून खेलो इंडिया प्रशिक्षण केंद्र (निवासी) म्हणून मान्यता प्राप्त झाली आहे. अशाप्रकारे, क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठित 'साई'ची मान्यता मिळणारे एमआयटी एडीटी विद्यापीठ हे राज्यातील पहिलेच विद्यापीठ ठरले आहे. एमआयटी एडीटी विद्यापीठातील क्रीडा संकुल हे जागतिक सोईसुविधांनी सुसज्ज आहे. विद्यापीठातील डॉ. विश्वनाथ कराड एमआयटी स्पोर्ट्स अकादमीमध्ये राष्ट्रीय स्तरावरील प्रशिक्षकांकडून रोइंग, बॉक्सिंग व जलतरण या खेळांसाठी अकादमीची स्थापना करत खेळाडूंना प्रशिक्षणाचे काम केले जाते. त्याच्या परिणामतः रोइंग अकादमीतील खेळाडूंनी आजवर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करताना पदक जिंकूण विद्यापीठाच्या शिरपेचात मानाचा तुरा खोवला आहे. गतवर्षी विद्यापीठातील स्कूल ऑफ लॉ'चे प्रा.आदित्य केंदारींनी आशियाई इनडोअर रोइंग स्पर्धेत भारताचे प्रतिनिधित्व करत सुवर्णपदक पटकाविले होते.

# पुण्याच्या लक्झरी रिअल इस्टेटमध्ये मार्व्हल रिअल्टर्सची महत्त्वाकांक्षी योजना

## तीन ते चार वर्षांत १,८०० पेक्षा अधिक युनिट्स वितरित करणार

**मार्व्हल रिअल्टर्स केवळ घरे बांधत नाहीयेत तर पुण्यातील लक्झरी राहणीमानाचे भविष्य घडवत आहेत. उत्कृष्ट इतिहास, दर्जाशी कोणतीही तडजोड न करणे आणि दूरदर्शी दृष्टिकोन यामुळे कंपनी रिअल इस्टेट उद्योगात आघाडीवर आहे. आपल्या वाढीच्या पुढच्या टप्प्यात प्रवेश करत असताना, परिवर्तनकारी अनुभव, अपवादात्मक गुणवत्ता आणि ग्राहक-केंद्रित उपाय प्रदान करण्यावर मार्व्हल रिअल्टर्स लक्ष केंद्रित करत आहे.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

नाविन्यपूर्ण आर्किटेक्चरल डिझाईनच्या माध्यमातून लक्झरी जीवनशैलीचा नवा अर्थ मांडणाऱ्या मार्व्हल रिअल्टर्सची ओळख पुण्यातील लक्झरी रिअल इस्टेट क्षेत्रातील अग्रणी म्हणून आहे. पुण्याच्या विकसित होत असलेल्या बाजारपेठेसाठी कंपनीने महत्त्वाकांक्षी योजना आखली असून पुढील तीन ते चार वर्षांत १,८०० पेक्षा अधिक युनिट्स वितरित करण्याची मार्व्हल रिअल्टर्सचे नियोजन आहे.




उत्कृष्टतेची आपली परंपरा पुढे चालू ठेवत मार्व्हल रिअल्टर्स कोरेगाव पार्क, बोट क्लब रोड, विमान नगर, खराडी, हडपसर, मगरपट्टा, बावधन आणि वाघोली येथे प्रीमियम निवासी आणि व्यावसायिक प्रकल्पांची मालिका सुरू करण्यास सज्ज झाली आहे. या प्रकल्पांमुळे उच्च दर्जाच्या राहणीमानात नवीन मापदंड स्थापित होणार असून भव्य लेआउटसह घरे, पूर्णपणे सुसज्ज लक्झरी अपार्टमेंट आणि उत्कृष्ट सुविधा उपलब्ध होणार आहेत. तसेच लक्झरी रिअल इस्टेट मार्केटमध्ये त्यांचे नेतृत्व आणखी मजबूत होईल.

बाजारपेठेतील वाढती मागणी पूर्ण करण्याच्या दृष्टीने पूर्णपणे सुसज्ज स्टुडिओ अपार्टमेंट्स आणि प्रीमियम टचसह रेडी-टू-मूव्ह-इन युनिट्स सादर करण्याची मार्व्हल रिअल्टर्सची योजना आहे. यामध्ये इन-हाऊस स्पा, सलून, गॉरमेट शेफ आणि वॉलेट सेवांसह अन्य विशेष सेवाही असतील. त्यामुळे लक्झरी आणि सोयींचा अनोखा मिलाफ होणार आहे. आपले ध्येय अधोरेखित करताना मार्व्हल रिअल्टर्सचे व्यवस्थापकीय संचालक. विश्वजीत झवर म्हणाले, मानवी अनुभव समृद्ध करणाऱ्या राहण्याच्या जागा तयार करणे हे आमचे नेहमीच ध्येय राहिले आहे. डिझाईनमधील नाविन्यपूर्णता, शाश्वतता आणि स्मार्ट लिव्हिंग सोल्यूशन्स यांना एकत्र आणून अतुलनीय गुणवत्ता प्रदान करण्यासाठी आणि शहरी जीवनशैलीला नवा अर्थ मिळवून देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

कंपनीने आतापर्यंत ५० हून अधिक प्रकल्प यशस्वीरित्या पूर्ण केले आहेत. यामध्ये ४५० हून अधिक इमारती आणि ९,००० अपार्टमेंटचा समावेश असून २७ दशलक्ष चौरस फूट विकसित जमिनीचा समावेश आहे. डिझाईनमधील उत्कृष्टता, नावीन्य आणि शाश्वततेसाठी अखंड समर्पणाने मार्व्हल रिअल्टर्स आधुनिक जीवनशैलीच्या कक्षा रूंदावत आहे.

मार्व्हल रिअल्टर्सने सातत्याने पुण्यातील काही प्रमुख ठिकाणी अत्यंत प्रतिष्ठेचे लक्झरी प्रकल्प पूर्ण केले आहेत. कंपनीने वाघोली येथील मार्व्हल फ्रिया आणि विमाननगर येथील मार्व्हल पियाझा यांसारखे प्रकल्प अलीकडेच पूर्ण केले आहेत. गुणवत्ता, सुविधा आणि लँडस्केपिंगमध्ये अपेक्षेपेक्षा जास्त कामगिरी करण्यासाठी कंपनीची कटिबद्धता त्यातून व्यक्त झाली आहे. बोट क्लब रोडवरील मार्व्हल रिबेरा, मगरपट्टा येथील मार्व्हल बाउंटी, एनआयबीएम रोडवरील मार्व्हल आयसोला आणि खराडी येथील मार्व्हल ॲक्वानस यासारखे उच्च दर्जाचे प्रकल्प पुढील तीन ते सहा महिन्यांत पूर्ण होणार आहेत. रिअल इस्टेट क्षेत्रात प्रगत नवकल्पना आणणारी अग्रणी कंपनी म्हणून मार्व्हल रिअल्टर्सने होम ऑटोमेशन, डबल-हाईट बाल्कनी, आयात केलेले संगमरवरी फ्लोअरिंग, वैयक्तिक स्टीम शॉवर आणि खाजगी पूल यासारख्या वैशिष्ट्यांसह नवीन मापदंड स्थापित केले आहेत. अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि जागतिक दर्जाच्या वैशिष्ट्यांचा वापर करून आधुनिक राहणीमानाच्या अनुभवांमध्ये क्रांती घडवून आणण्याचे कंपनीचे उद्दिष्ट आहे.

शाश्वततेवर कंपनीने लक्ष केंद्रित केल्यामुळे ऊर्जा-कार्यक्षम इमारती, व्यापक हिरवे लँडस्केपिंग आणि अक्षय ऊर्जा एकत्रीकरणावर कंपनीने भर दिला आहे. मार्व्हल रिअल्टर्सने प्लॅटिनम-ग्रीन प्रमाणपत्रासाठी पाठपुरावा केलेला असून पर्यावरणीयदृष्ट्या जबाबदार विकासावरील त्यांची निष्ठा त्यातून अधोरेखित होते.

नवोन्मेष आणि शाश्वततेवर लक्ष केंद्रित करून मार्व्हल रिअल्टर्सने चोखंदळ घरमालकांच्या बदलत्या गरजा पूर्ण करणारे कालातीत, डिझाइन-चालित प्रकल्प सादर केले आहेत. त्यामुळेच रिअल इस्टेट क्षेत्रात ती आघाडीवर आहे.

# कूकडी डावा कालव्याचे आवर्तन १५ फेब्रुवारी सुटणार - आमदार काशिनाथ दाते सर

**पारनेर (दै. आरंभ पर्व)**

कुकडी प्रकल्पातील येडगाव धरणातून निघोज परिसरातील एकूण १४ गावांना शेतीसाठी पाणी दिले जाते. या कूकडी डावा कालव्यातून आवर्तन सोडवण्यासाठी तारखा ठरलेल्या असून २० फेब्रुवारी रोजी या कुकडी कालव्यातून पाणी सोडण्यात येणार होते. हे आवर्तन ठरलेल्या तारखेच्या अगोदर सोडावे अशी मागणी निघोज परिसरातील नागरिकांनी आमदार काशिनाथ दाते सर यांच्याकडे केली होती.

आता उन्हाळी पिकांना दिवसेंदिवस पाण्याची जास्त गरज असुन पिकांना वेळेत पाणी न मिळाल्यास ते जळून शेतकऱ्यांची अतोनात नुकसान होऊ नये यासाठी आमदार काशिनाथ दाते सर यांनी ठरलेल्या आवर्तनाच्या पाच दिवस अगोदर पाणी सोडावे अशी आग्रही मागणी शिर्डी येथे सहकार परिषद मध्ये आमदार काशिनाथ दाते सर यांनी शेतकऱ्यांचे मागणी प्रमाणे कार्यवाही व्हावी म्हणून जलसंपदा मंत्री नामदार राधाकृष्ण विखे पाटील यांची भेट घेऊन त्यांना विनंती केली.

आमदार दाते सर यांच्या प्रश्नाची तात्काळ दखल घेऊन शेतकऱ्यांचा जिव्हाळ्याचा प्रश्न मार्गी लावीत ना. जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे यांनी तात्काळ कुकडी प्रकल्पाचे मुख्य अभियंता श्री. धुमाळ यांना 15 फेब्रुवारी रोजी आवर्तन सोडण्याचा आदेश त्यांनी दिला आहे. शेतकऱ्यांना या आवर्तनाचा गरजेच्या वेळी नक्कीच फायदा होणार असून पाच दिवस अगोदर आवर्तन सुटणार असल्याने त्यांच्यामध्ये समाधानाचे वातावरण पाहायला मिळत आहे. निघोज परिसरातील शेतकऱ्यांनी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे व आमदार काशिनाथ दाते सर यांचे आभार व्यक्त केले आहे.



# ४१ वर्षांनी मिळाला जुन्या आठवणींना उजाळा

- कनेरसरच्या शाळेत पुन्हा भरला शाळेत १९८४ चा दहावीचा वर्ग

**किरण खुडे**

**या कार्यक्रमप्रसंगी तत्कालीन शिक्षक आ.बी देशमुख, पी. आर. महाडिक, बी. ए. शिंदे, व्ही. एन. इसकांडे, डी. एस. सांगळे, जे.एम. तळपे, पी. ए. व्हीले, डी.एस कुमकर (मुख्याध्यापक), गोविंद हिंगे (माजी मुख्याध्यापक), पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष महेंद्र शिंदे, बाळासाहेब सांडभोर, शिक्षण संस्थेचे पदाधिकारी आदी मान्यवर व माजी विद्यार्थी, ग्रामस्थ, मोठ्या संख्येने उपस्थित होते. तर काही माजी विद्यार्थी आपली मुले, मुली, नातवंडासह सहकुटुंब आपली शाळा व मित्र मंडळ दाखवायला घेऊन आले होते. या शाळेचे माजी विद्यार्थी या संमेलनासाठी पुणे, मुंबई, नाशिक, कोल्हापूर अशा दुरदुरहुन उपस्थित झाले होते. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माजी विद्यार्थी अतुल कानडे, विमल दौंडकर,सुनिता दौंडकर,जयप्रकाश दौंडकर, विलास दौंडकर, ज्ञानेश्वर सावंत, चींधु राऊत, सावळेराम गावडे, शोभा महाडिक, देविदास दौंडकर आदींनी विशेष परिश्रम घेतले.**



**राजगुरुनगर (दै. आरंभ पर्व)**

कनेरसर (ता.खेड) येथे अंबिका विद्यालयात १९८४ साली दहावीत शिकत असणाऱ्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी एकत्र येत ४१ वर्षांनी पुन्हा लहान होत आपला दहावीचा वर्ग भरवला. पुन्हा शाळा, प्रार्थना, पुन्हा अभ्यास, पाठांतर, गृहपाठ, घोकंपट्टी अशा अनेक गमतीजमती करत सगळे मित्रमैत्रिणी लहानपणाच्या आठवणीत रमुन गेले होते.

४१ वर्षांनी जुन्या आठवणींना उजाळा देत शाळेचे स्नेहसंमेलनच या निमित्ताने भरले होते. कनेरसर येथील अंबिका विद्यालयात सन १९८४ साली इयत्ता दहावीत शिकत असणाऱ्या सर्व माजी विद्यार्थ्यांनी परस्परांना संपर्क करत एकत्र येऊन या स्नेहसंमेलनाचे आयोजन केले. ४१ वर्षांपूर्वी पुढील शिक्षणाकरीता गावाबाहेर गेलेले बालपणाचे सहकारी स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने एकत्र जमले आणि जुन्या आठवणींना उजाळा मिळाल्याने सर्वजण बालपणातील शालेय जीवनात रंगून गेले.

शालेय जीवनातील त्यावेळी झालेल्या गंमती जमती एक एक जण आठवण करून सांगू लागल्याने सर्वजण बालपणाच्या आठवणीत रममाण झाले होते. या निमित्ताने पुन्हा या माजी विद्यार्थ्यांची एक दिवसाची शाळा संपन्न झाली. त्यावेळी शिकवायला असणाऱ्या सर्व शिक्षकांना या कार्यक्रमासाठी निमंत्रित करण्यात आले होते.

बालपणाचे सर्व सहकारी गावातील कुलस्वामिनी यमाईमाता मंदिरात जमले. सर्वांनी फेटे बांधून यमाई मातेचा आशीर्वाद घेतला. गावातून वाजत गाजत मिरवणुकीने सर्वजण शाळेत एकत्र जमले. बालपणी शाळेत असलेल्या सर्व गोष्टींना उजाळा देऊन या सर्व माजी विद्यार्थ्यांची एक दिवसाची शाळा सुरू झाली. बरोबर दहा वाजता शाळेची घंटा वाजली. सर्वांनी उपस्थित राहून राष्ट्रगीत व प्रार्थना करून शाळेचा पहिला तास सुरू झाला. दुपारी जेवणाची सुटी, माजी विद्यार्थी व शिक्षकांचे मनोगत झाले.

सर्वांना परस्परांनी सन्मानित केले. या माजी विद्यार्थ्यांमध्ये कोणी आय.ए.एस , आय. पी. एस अधिकारी होते. तर कुणी समाजकारणात, कोणी राजकारणात तर कोणी उत्तम शेतकरी असे विविध क्षेत्रात काम करणारे सर्व माजी विद्यार्थी एकत्रित आल्याने शाळेत एक वेगळेच वातावरण निर्माण झाले होते.

दरम्यान, यावेळी खेड तालुका पत्रकार संघाचे नवनिर्वाचित अध्यक्ष संजय शेटे, सचिव किरण खुडे, उपाध्यक्ष रामचंद्र सोनवणे अन्य नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचा या वेळी सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला अनेक मान्यवरांनी भेट देऊन शुभेच्छा दिल्या.

# नवनीत एज्युकेशन लिमिटेडने सादर केले 'नवनीत एआय'

## शिक्षकांचा अध्यापन अनुभव समृद्ध करण्यासाठी पुढाकार

**जसजसे शिक्षणाचे स्वरूप बदलत आहे, तसतसे नवनीत शिक्षकांसाठी डिजिटल सहाय्यक उपलब्ध करून देत आहे. हे सहाय्यक शैक्षणिक उत्कृष्टतेची पारंपरा आणि डिजिटल नवकल्पना यांना एकत्र जोडते. 'नवनीत एआय'च्या माध्यमातून कंपनी भारतातील शिक्षणाच्या भविष्याला अधिक सक्षम करण्याच्या आपल्या बांधिलकीवर शिक्कामोर्तब केले आहे, जेणेकरून परंपरा आणि तंत्रज्ञान याच्या एकत्रीकरणामुळे शिक्षणाचा अनुभव अधिक प्रभावी आणि आधुनिक होईल.**

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

शिक्षण क्षेत्रातील अग्रणी असलेल्या नवनीत एज्युकेशन लिमिटेडने 'नवनीत एआय' लॉन्च करण्याची घोषणा केली आहे. शिक्षकांना ज्ञानाचा आणि संसाधनांचा सुलभपणे वापर करता यावा या दृष्टीने हा नवा उपक्रम तयार करण्यात आला आहे. नवनीतच्या समृद्ध शैक्षणिक साहित्याचा आधार घेत, 'नवनीत एआय'मधील साधनांमुळे शिक्षकांना अधिक प्रभावीपणे शिकविण्यास मदत होईल. हे व्यासपीठ इंटरॲक्टिव्ह आणि वापरण्यास सोपे आहे. याच्या मदतीने शिक्षक क्विझ, गृहपाठ, पीपीटी, फ्लॅशकार्ड, सारांश आणि अन्य शैक्षणिक साहित्य सहज तयार करू शकतील.




अनेक दशकांपासून देशभरातील शिक्षक आणि विद्यार्थी नवनीतच्या अभ्यासासंबंधी पुस्तकांचा आणि संसाधनांचा वापर करत आहेत. नवनीत डायजेस्ट, वर्कबुक, नवनीत २१ मोस्ट लाइकली क्वेश्चन सेट्स, प्री-प्रायमरी आणि मुलांसाठी प्रकाशित पुस्तकांमुळे शिकणे सोपे झाले आहे. आता 'नवनीत एआय'च्या माध्यमातून ५०,०००हून अधिक संसाधने नव्या स्वरूपात सादर करण्यात येत आहेत. या संसाधनांमुळे अभ्यास करण्याचा अनुभव अधिक आकर्षक आणि प्रभावी होईल. या नव्या व्यासपीठामुळे शिक्षकांना डिजिटल साधने उपलब्ध होणार आहेत. या साधनांमुळे अध्यापन अधिक सोपे आणि परिणामकारक होईल. पारंपरिक शैक्षणिक संसाधनांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडून शिक्षण अधिक प्रभावी करण्याचा नवनीत एज्युकेशनचा प्रयत्न आहे.

"नवनीत एआयच्या माध्यमातून शिक्षकांसाठी अध्ययन-साहित्य अधिक सुलभ आणि त्यांच्या गरजेनुसार लवचिक करणे, हा आमचा आमचा उद्देश आहे" असे नवनीत एज्युकेशन लिमिटेडचे ब्रँडिंग, मार्केटिंग आणि सेल्स डायरेक्टर देविश गाला म्हणाले.

ते पुढे म्हणाले, "डिजिटल तंत्रज्ञान आणि विश्वासार्ह शैक्षणिक साहित्याची सांगड घालून आम्ही शिक्षकांना नवीन पिढीला प्रेरित करण्याच्या त्यांच्या प्रयत्नांमध्ये पाठबळ देत आहोत. आम्ही तांत्रिक प्रगतीसोबत पुढे जात राहू आणि बदलत्या शैक्षणिक गरजा पूर्ण करू, या संकल्पाचा हा प्रकल्प एक भाग आहे."

नवनीत एज्युकेशन लिमिटेडच्या टॉपटेकचे सीईओ हर्षिल गाला म्हणाले की, नवनीत एआयमुळे शिक्षण पद्धतीत मोठा बदल घडत आहे. त्यामुळे शिक्षक आणि विद्यार्थी दोघांसाठीही शिकण्याची प्रक्रिया अधिक इंटरॲक्टिव्ह आणि प्रभावी होत आहे.

नवनीत नेहमीच शिक्षणातील नवकल्पनांचा अग्रणी राहिला आहे. या नवीन टूलच्या मदतीने कंपनी एक मोठे पाऊल पुढे टाकत आहे. तंत्रज्ञानाच्या सहाय्याने शिक्षक अधिक सक्षम होतील आणि विद्यार्थ्यांचा शिक्षणाचा अनुभव पूर्वीपेक्षा अधिक प्रभावी होईल.

नवनीत एआय हे भारताचे पहिले कस्टम शिक्षण मॉडेल आहे. सध्या जनरल एआय चॅटबॉट्स विद्यार्थ्यांसाठी स्टडी असिस्टंट म्हणून वापरले जात आहेत. अशा परिस्थितीत नवनीतने शिक्षकांसाठी विचारपूर्वक विशेष प्लॅटफॉर्म तयार करण्याचा निर्णय घेतला. ही एआय यंत्रणा मल्टी-एजेंट आर्किटेक्चरवर काम करते, जिथे प्रत्येक विशेष एजंट आउटपुट अधिक चांगले करण्यासाठी महत्त्वाची भूमिका बजावतो. यात करिक्युलम अलाइनमेंट एजंट, कंटेंट स्ट्रक्चरिंग एजंट, व्हिज्युअल डिझाइन एजंट, असेसमेंट क्रिएशन एजंट, क्वालिटी व्हेरिफिकेशन एजंट आणि अन्य एजंट्स समाविष्ट आहेत. या सर्व एजंट्समुळे एकत्रितपणे शैक्षणिक साहित्याची अचूकता, स्पष्टता आणि परिणामकारकता सुनिश्चित होते.

या संरचनेमुळे शैक्षणिक मानकांचे पालन सुनिश्चित होते आणि प्रभावी शिक्षणासाठी भक्कम पाया तयार होतो. हे सर्व नवनीतच्या विश्वासार्ह साहित्याच्या वापरामुळे शक्य झाले आहे, जे सहा दशकांच्या अनुभवाने आणि तज्ज्ञांच्या मार्गदर्शनातून विकसित करण्यात आले आहे. हा नवोपक्रम अनेक वर्षांच्या सखोल अभ्यास आणि प्रयोगांमधून तयार झाला आहे. त्यामुळे तो नाविन्यपूर्ण आणि किफायतशीर ठरतो. संकल्पनेपासून अंमलबजावणीपर्यंत प्रत्येक टप्प्यावर त्याचा उपयोग होतो.

नवनीत एज्युकेशन लिमिटेड शिक्षकांना 'नवनीत एआय'ची माहिती देण्यासाठी आणि त्याचा पूर्ण उपयोग करता यावा यासाठी Q&AI विद नवनीत एआय या कार्यशाळांची मालिका आयोजित करणार आहे. या कार्यशाळांचा उद्देश शिक्षकांना प्रत्यक्ष अनुभव देणे, त्यांच्या शंकांचे समाधान करणे आणि त्यांना या प्लॅटफॉर्मचा आत्मविश्वासाने वापर करता यावा याची खात्री करणे हा आहे. त्यामुळे त्यांची अध्यापन पद्धती अधिक प्रभावी बनेल.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.